राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार

तक्रार क्र. २०७/२०२६

तक्रारकर्ता, श्रीमती अनुष्का अंकुश फडके,
रुम नं. ३, तळमजला, रस-सागर सोसायटी,
शिवाजी नगर, राबोडी नं. २, आकाशगंगा कॉम्प्लेक्स समोर
ठाणे (प.) - ४०० ६०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, जुनी इमारत, कोर्ट नाका,
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, ठाणे ४०० ६०१.

माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक	जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक	प्रथम अपिल आदेश दिनांक
२३/०२/२०२६	१७/०३/२०२६	--	--

जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती स्पष्ट, संग्रहित व उपयोगी स्वरुपाची नसून, माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन झाले आहे, असे कारण नमूद करुन तक्रारकर्ता श्रीमती अनुष्का अंकुश फडके यांनी दि.१८/०५/२०२६ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

तक्रारदार यांनी दिनांक २३.०२.२०२६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज सादर करून RCS No. ३२/२०२५ प्रकरण संदर्भातील न्यायालयीन अभिलेख, प्रमाणित प्रती देण्याची कार्यपद्धती, प्रशासकीय अभिलेख, नियम, कार्यालयीन आदेश तसेच इतर संबंधित माहिती मागितली आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार मागितलेली माहिती पूर्णपणे उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर तक्रार आयोगासमोर दाखल करण्यात आली आहे.

उपलब्ध अभिलेखांचे परीक्षण करता असे दिसून येते की अर्जामधील अनेक बाबी या न्यायालयीन अभिलेखांच्या प्रमाणित प्रती, न्यायालयीन कार्यवाही, नोंदी तसेच विद्यमान नियम व कार्यपद्धतीशी संबंधित आहेत. अशा स्वरूपाच्या माहितीचा पुरवठा संबंधित न्यायालयाच्या प्रचलित नियमावली, कॉपींग रुल्स अथवा अन्य वैधानिक प्रक्रियेनुसार केला जातो.

सदर प्रकरणात उपलब्ध अभिलेखांवरून जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती नाकारली, माहिती नष्ट केली अथवा अधिनियमातील तरतुदींचे जाणीवपूर्वक उल्लंघन केले असल्याचे ठोस पुरावे आयोगासमोर उपलब्ध नाहीत. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत दंडात्मक अथवा अन्य कारवाई करण्यास पुरेसा आधार उपलब्ध होत नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, मुख्य माहिती आयुक्त व इतर विरुध्द मणिपूर राज्य सरकार व इतर, सिव्हील अपिल क्र. १०७८७-१०७८८/२०११ या प्रकरणी दि. १२/१२/२०११ रोजी दिलेल्या न्याय निर्णयामध्ये माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ तसेच कलम १९ ची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. तसेच सदर आदेशाच्या परिच्छेद ३२ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे -

"In the facts of the case, the appellant after having applied for information under section 6 and then not having received any reply thereto, it must be deemed that he has been refused the information. The said situation is covered by Section 7 of the Act. The remedy for such a person who has been refused the information is provided under Section 19 of the Act."

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १२/१२/२०११ च्या आदेशामधील परिच्छेद ३५ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ व कलम १९ मधील प्रक्रिया पूर्णत: भिन्न आहेत. कलम १८ चे अधिकार हे पर्यवेक्षकीय स्वरुपाचे अधिकार आहेत, तर कलम १९ अंतर्गत अपिलाची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. त्यानुसार ज्या व्यक्तीस माहिती नाकरण्यात आलेली आहे किंवा माहिती मिळालेली नाही, अशा व्यक्तीने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक तरतूदींचे पालन करुन माहिती प्राप्त करणे आवश्यक आहे. परिच्छेद ३५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे -

"The contention of the appellant that information can be accessed through Section 18 is contrary to the express provision of Section 19 of the Act."

त्यानुसार अपिलार्थी /तक्रारदार यांनी माहिती मिळविण्यासाठी कायद्याने ठरवून दिल्यानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रियेनुसार आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक आहे. तथापि तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता, या तक्रार प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रियेचा अवलंब न करता व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात न घेता आयोगाकडे तक्रार दाखल केली असल्याचे स्पष्ट होते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१२/१२/२०११ च्या निर्णयान्वये दिलेले निर्देश विचारात घेता, तक्रारदार यांनी दाखल केलेला तक्रार अर्ज मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाशी सुसंगत नसल्याने, सदर तक्रारीवर अधिक कार्यवाहीची आवश्यकता दिसून येत नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जुलै, २०२६

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

प्रत,

१) श्रीमती अनुष्का अंकुश फडके, रुम नं. ३, तळमजला, रस-सागर सोसायटी, शिवाजी नगर, राबोडी नं. २, आकाशगंगा कॉम्प्लेक्स समोर, ठाणे (प.) - ४०० ६०१.
२) जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जुनी इमारत, कोर्ट नाका, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, ठाणे ४०० ६०१.